महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०६ वा | दिनांक : ०५/१०/२०२५ | वार : रविवार

## दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता लागू होईल : चंद्रकांत पाटलांनी दिला कानमंत्र



**पुणे :** महाराष्ट्रात आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात आता चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर तंत्र व उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू, असे त्यांनी म्हटले आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, लोकसभा, विधान सभेपेक्षा नेत्याची खरी निवडणूक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका असते. लोकशाहीमधील सर्वात महत्त्वाची ही निवडणूक आहे. कदाचित आज (४ ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल. आता कुणीतरी म्हणतील निवडणूक आयोगाशी दादांची चर्चा झाली वाटते. मी ४० वर्षे यामध्ये घालवली त्यामुळे मी अंदाज मांडला आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू या, असे त्यांनी म्हटले आहे. भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात ते बोलत होते.

पुढे बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, २०१९ साली ज्यांचे तिकीट नाकारले त्या बावनकुळे यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार मिळाले. निवडणूक ही फास्ट ट्रेन प्रमाणे आहे, प्लॅटफॉर्मवर जो राहील तो राहील. मात्र, नाराज होऊ नका. राजकारणात प्रयत्नाबरोबरच नशीब देखील लागते. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये मोठा फरक असला पाहिजे. २०१७ ची परिस्थिती बदला, त्यासाठी येणाऱ्या दिवाळीचा फायदा करून घ्या. लोकांना भेटून संपर्क वाढवा, असा कानमंत्र पाटील यांनी यावेळी बोलताना दिला आहे.

चंद्रकांत पाटील म्हणाले, निवडणूक महायुती म्हणून लढवायची आहे मात्र शेवटच्या क्षणी कोणता निर्णय घ्यायचा हे वरिष्ठ नेते ठरवतील. आमच्या कोणत्याही कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मागत असलेल्या ठिकाणी आपला चांगला उमेदवार असेल तर मैत्रीत लढू, पण कार्यकर्त्यांचा बळी दिला जाईल असे लढणार नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी २०१९ साली थोडा समजूतदारपणा दाखवला असता तर हे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शोधावे लागले असते, पण ते आडून बसले नसते तर राज्यात चित्र वेगळे दिसले असते. नियती ही नियती असते. २०१९ साली सरकार जाणे हा नियतीचा खेळ आहे. २०१९ साली उद्धव ठाकरे यांनी हे सगळे करून काय मिळवले? मी कधीच कोणतं तिकीट मागितलं नाही, नेत्याची इच्छा म्हणजे कार्यकर्त्यांसाठी आज्ञा असल्याचे चंद्रकांत पाटील म्हणाले.

## भाजप म्हणजे देश लुटणारी टोळी : फडणवीस 'कमिशनवाले' मुख्यमंत्री : संजय राऊत

**पुणे :** शिंदे गटाच्या लोकांनी शस्त्र म्हणून अमित शहा यांच्या जोड्याची पूजा केली. हे बाळासाहेब ठाकरे यांना दैवत माणत नाही. हे मोदी आणि भाजपच्या चरणी विलीन झाले आहे,असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर राज्यातील मनपासाठी राज ठाकरे, मविआ यांच्यासोबत आमच्या चर्चा सुरू आहे. प्रकाश आंबेडकर यांची भूमिका कायम संघ आणि भाजपला मदत होईल अशीच असते हे पण तेवढेच खरं आहे, असा टोला राऊतांनी लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हा फार कंजूस माणूस आहे. त्यांनी पेशव्यांचा आदर्श घ्यायला हवा ते फार दिलदार माणसं होती. १ हजार रुपयांची पैज लावता का? उद्धव ठाकरेंनी त्यांच्या भाषणामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवला आहे. शेतकऱ्यांना कशी मदत मिळावी हे सांगितले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांचे भाषण ऐकले पण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उद्धव ठाकरे बोलत असताना त्यांनी कानात बोळे घातले होते. एकरी आणि हेक्टरी मदत, कर्जमाफीबद्दल भूमिका मांडली आहे.

संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी मुंबईचा मुद्दा मांडला त्यांना हा विकासाचा मुद्दा वाटत नाही. शहरांची अदानीच्या माध्यमातून नासाडी सुरू आहे हा मुद्दा त्यांना विकासाचा मुद्दा वाटत नसेल कारण देवेंद्र फडणवीस यांनी २५ टक्के दलाली मिळत आहेत. हा कमिशन वाला मुख्यमंत्री आहे. देवेंद्र फडणवीस हे लाचार आहेत त्यांना सत्य ऐकणं जमत नाही. म्हणून त्यांना उद्धव ठाकरेंच्या भाषण समजले नाही. भाजप हा पक्ष नसून देश आणि राज्य लुटणारी टोळी आहे.

संजय राऊत म्हणाले की, रामदास कदम हे विश्वासास पात्र कधीच नव्हते. खरंतर त्यांनी उद्धव ठाकरे यांचा फोटो लावून त्यांची रोज पूजा केली पाहिजे. कोकणात विधानसभेची निवडणूक हरल्या नंतरही उद्धव ठाकरेंनी दोन वेळा त्यांना विधान परिषदेवर पाठवले, असे कुठल्या पक्षात होते का? दोन लोकांना विधान परिषदेवर पाठवण्यासाठी पक्षातून सातत्याने विरोध होता. त्यातील एक रामदास कदम तर दुसऱ्या नीलम गोऱ्हे या होत्या. गोऱ्हेंचे पक्षातील योगदान काय हा प्रश्न कायम विचारला गेला, कदमांना इतके वर्षे संधी मिळाली आहे त्यांना पुन्हा विधान परिषदेवर का पाठवत आहे असे प्रश्न उद्धव ठाकरेंना पक्षातून प्रश्न विचारले गेले. पण उद्धव ठाकरेंनी दयाबुद्धीने त्यांना ही संधी दिली. त्यांनी गरळ ओकणे अत्यंत चुकीचे आहे.

## रामदास कदमांच्या पत्नीने जाळून घेतले की त्यांना जाळले? : अनिल परब



**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी दसरा मेळाव्यात बोलताना स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या मृत्यूवरून गंभीर आरोप केले होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले होते. तसेच बाळासाहेबांची बॉडी दोन दिवस ठेवण्यात आली होती, ती कशासाठी ठेवण्यात आली होती? असा प्रश्न उपस्थित करत उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केला होता. यावर प्रत्युत्तर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी दिले आहे.

पत्रकार परिषद घेत अनिल परब म्हणाले, त्यांना उत्तर देण्याची गरज आम्हाला वाटत नव्हती, कारण पोरी बाळी नाचवून किंवा भाड खाऊन भाडगिरी करणाऱ्यांना उत्तर देण्याची आम्हाला गरज वाटत नाही. तरी सुद्धा आमच्या दैवताच्या बाळासाहेबांच्या मृत्यूवर त्यांनी संशय घेतला आहे म्हणून त्याचे उत्तर देणार. बाळासाहेबांच्या अंतिम क्षणी मी २४ तास तिथे होतो, त्यामुळे मी या संपूर्ण घटनेचा साक्षीदार आहे. रामदास कदम हे आता बाळासाहेब गेल्यानंतर जवळपास १४-१५ वर्षांनी त्यांना कंठ फुटला आहे. बाळासाहेब २०१२ ला गेले, २०१४ ला रामदास कदम मंत्री झाले. त्यांना मंत्री कोणी केले उद्धव ठाकरेंनी. उद्धव ठाकरे इतके वाईट होते तर त्यांनी मंत्रिपद का स्वीकारले? मुलाला आमदारकी दिली. जोपर्यंत उद्धव ठाकरेंकडून मिळत होते तोपर्यंत उद्धव ठाकरे चांगले होते. स्वतः मराठा स्वाभिमानी समजता तर त्याच वेळी हा पक्ष सोडून जायला पाहिजे होते.

पुढे बोलताना अनिल परब म्हणाले, २०१२ ला रामदास कदम कुठल्या बाकड्यावर झोपले होते, हा बाकडा मी शोधत आहे. मातोश्रीमध्ये असल्या कुठल्या बाकड्यावर कोणाला झोपू देत नाहीत. बाळासाहेब ज्या खोलीत होते शेवटचे काही दिवस, त्यावेळेला २४ तास तिथे डॉक्टरांचे पथक होते. प्रत्येक मिनिटाला मॉनिटर केले जात होते. असंख्य लोक भेटायला येत होते. सर्वांना माहीत होते की बाळासाहेब जीवंत आहेत. परंतु, त्यांच्या मृत्यूवरून आता राजकारण करत सध्याच्या मुद्द्यावरून लक्ष विचलित करण्याचा हा त्यांचा कुटिल डाव आहे. रामदास कदम म्हणतात नार्को टेस्ट करा, आमचे सुद्धा म्हणणे आहे की ही टेस्ट झालीच पाहिजे. रामदास कदम यांनी जे काही आरोप केले आहेत, त्याच्या विरोधात मी स्वतः अब्रनुकसानीचा दावा ठोकणार आहे. या अब्रूनुकसानीच्या दाव्यातून जी रक्कम येईल ती पूरग्रस्तांना पाठवण्यात येईल.

रामदास कदम यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या मृत्यूबद्दल केलेला दावा १०० टक्के खोटा आहे. बाळासाहेब यांना भेटायला असंख्य लोकांची गर्दी होती. तुम्ही सगळे प्रेसवाले आहात, कुठली बॉडी दोन दिवस ठेवता येते का? कुठलाही मृतदेह दोन दिवस शवपेटीशिवाय ठेवता येऊ शकतो का? ही गोष्ट न समजण्याइतकी रामदास कदमची अक्कल गुडघ्यात आहे का? त्याला जे काय कुणी सांगितलं आहे ना त्याने हे तरी विचार करायला पाहिजे होता किंवा रामदास कदम यांनी बोलताना विचार करायला पाहिजे होता. कुठलाही मृतदेह दोन दिवस शव पेटीशिवाय ठेवता येतो का? कुठली इंजेक्शन दिली, काही जरी केले तरी हे शक्य नाही

पुढे बोलताना अनिल परब म्हणाले, रामदास कदम यांच्या बायकोने स्वतःला जाळून घेतले १९९३ ला. ते जाळून घेतले की तिला जाळले हे देखील नार्को टेस्टमध्ये आले पाहिजे. खेडमध्ये कोणाला बंगले बांधून दिले, त्या बंगल्यावरून काय गोंधळ झाला हे सगळे बाहेर आले पाहिजे. जर हे नार्को टेस्टमध्ये बाहेर नाही आले तर त्यांचा मुलगा योगेश कदम गृहराज्य मंत्री आहेत. आपल्या बापाने काय उद्योग केले आहेत १९९३ ला याची देखील चौकशी झाली पाहिजे. याची मागणी मी करत आहे. माझी मागणी आहे मुख्यमंत्र्यांकडे की १९९३ ला गृहराज्य मंत्र्याच्या आईने स्वतःला जाळून घेतले होते, त्या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ ऑक्टोबर २०२५


## जीवन विकास ग्रंथालयात अभिजात मराठी भाषा दिन व स्वामी रामानंद तीर्थ जयंती साजरी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील टिळकनगर येथील जीवन विकास ग्रंथालयात 3 आक्टोंबर 2025 रोजी अभिजात मराठी भाषा दिन व स्वामी रामानंद तीर्थ जयंती साजरी करण्यात आली.यनिमित्त उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे निर्देशानुसार दिनांक 3 आक्टोबर 2025 रोजी अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त "अभिजात मराठीतील निवडक दुर्मिळ ग्रंथांचे" प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन ग्रंथालयाच्या कै. सरला गुरसहानी अभ्यासिकेतील डॉ.अश्विनी परदेशी हीच्या हस्ते करण्यात आले. हैदराबाद मुक्ती संग्रामाचे अध्वर्यू स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीदिनी प्रतिमेचे पूजन करून हे उदघाटन करण्यात आले. यावेळी ग्रंथालयाचे कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर यांनी विद्यार्थ्यांना "भारतातील तामिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, ओडिया, मराठी, बंगाली, पाली, प्राकृत आणि आसामी यांचा समावेश अभिजात मराठी भाषेत होतो. दिनांक 3 ऑक्टोबर रोजी मराठी भाषेला केंद्र सरकारने हा दर्जा दिला", यासंबंधीची माहिती दिली.

तसेच प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या ग्रंथाची माहिती त्यांना देऊन अभ्यास करतांना वाचनाचे महत्व विशद केले. स्वामीजीं बद्दल माहिती देतांना हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्व करणारे नेते म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची संक्षिप्त माहिती दिली. यावेळी अभ्यासिकेतील विद्यार्थी व ग्रंथालयाचे वाचक तसेच कर्मचारी सौ. अश्विनी काजवे, सौ. प्रीती अंकुशे, श्री. लक्ष्मण मोरे, श्री. शांतीलाल जाधव इत्यादी उपस्थित होते..

## युवकांनी महात्मा गांधीजींचा निर्भय बनो या तत्वाचे सुध्दा पालन करावे : प्रा. डॉ. डोळे




**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी स्मारक निधी समर्थनगर या ठिकांनी महात्मा गांधीजी जयंतीनिमित्त व्याख्यान आयोजोत केले . या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक डॉ डी एस काटे हे होते.

तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. प्रकाश परांजपे सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश तसेच प्रा डॉ जयदेव डोळे हे होते. ॲड. प्रकाश परांजपे यांनी महात्मा गांधीजी यांची विचारांची समर्पकता या विषयी विचार मांडले.

तर प्रा. डॉ. डी. एस. काटे यांनी महात्मा गांधीजी यांचे आर्थिक विचार ग्राम स्वराज खेड्याकडे चला या संकल्पनेवर प्रकाश टाकला. प्रा. डॉ. जयदेव डोळे यांनी गांधीजी यांचे विचार आणि युवक या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा डॉ मछिंद्रनाथ गोरडे कार्याध्यक्ष महात्मा गांधी स्मारक निधी यांनो केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाई चंद्रकांत चव्हाण यांनी तर प्रा डॉ राजेश करपे सदस्य विद्या परिषद डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी केले यावेळी विद्यार्थी आणि सुजन नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

## प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळेत भव्य नेत्र तपासणी शिबिर संपन्न : १०० विद्यार्थ्यांना मोफत चष्मे वाटप



**छत्रपती संभाजीनगर :** रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद इलाईट, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, लायन्स हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आणि प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयाच्या सहकार्याने आज दिनांक 29 सप्टेंबर 2025 रोजी, सोमवारी, एन-11 हडको येथील प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळेत भव्य नेत्र तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामुळे शेकडो विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.या शिबिरामध्ये शाळेतील 100 विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी करून त्यांना आवश्यकतेनुसार चष्म्यांचे वाटप करण्यात आले. यासोबतच, परिसरातील 200 हून अधिक पालक आणि नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ज्या पालकांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले, त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्याची सोय देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या आरोग्य शिबिरासाठी लायन्स हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर, डॉ. प्रांजल मिठावाला, डॉ. शामली आणि डॉ. सईद यांनी उपस्थित राहून रुग्णांची तपासणी केली व त्यांना डोळ्यांच्या आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लबच्या अध्यक्ष माधरी सांगवीकर यांच्यासह सदस्य अंजली भालचंद्र, रवींद्र बोडखे, आणि बी. अत्रे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच, संस्थेचे अध्यक्ष श्री. निलेश पाटील, माध्यमिक मुख्याध्यापक श्री. शैलेंद्र पाटील आणि प्राथमिक मुख्याध्यापक श्री. प्रकाश ढमाले यांचे आयोजन आणि मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले.या संयुक्त उपक्रमामुळे गरजू विद्यार्थी आणि नागरिकांना एकाच ठिकाणी नेत्र तपासणी आणि उपचाराची सोय उपलब्ध झाली. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राबवलेल्या या शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ ऑक्टोबर २०२५







## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन




**जालना :** महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे निमित्ताने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात ३ ऑक्टोबर २०२५ रोजी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यात विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. २३ रक्तदात्यांनी यासाठी योगदान दिले. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉ. राजेंद्र शेजुळे, डॉ. भाला, श्रीधर देवकर, अरुण धोत्रे, सपना जैस्वाल, गणेश सरोदे, मंगेश भोसले, राजू राठोड यांनी सहकार्य केले.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. उद्धव थोरवे, डॉ. क्षमा अनभुले, प्रा. अभिजीत भुतेकर, डॉ. भगवानसिंग डोभाळ, यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

## मानवी जीवनाला आकार देण्याच काम हे महाविद्यालय करत असते : डॉ.प्रतिभा अहिरे




**कन्नड :** शिवाजी महाविद्यालयात दिनांक 4/१०/2025 रोजी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यास प्राचार्य, प्राध्यापक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे प्रमुख डॉ एस एम पवार यांनी केले, त्यांनी माझी विद्यार्थांना मार्गदर्शन करत असताना सांगितले की माझी विद्यार्थांनी आपल्या महाविद्यालयासाठी वेळात वेळ काढून यायला पाहिजे तसेच आपल्या परीने विद्यार्थांना मार्गदर्शन केले पाहिजे ती त्याची जबाबदारी आहे.

माझी विद्यार्थी व पालक म्हणून महाविद्यालयाच्या सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख ख्यातनाम कवयत्री डॉ.प्रतिभा अहिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना सांगितले की, व्यक्ती हा आयुष्यभर विद्यार्थी असतो माणसाच्या जडणघडणीत महाविद्यालय अतिशय महत्त्वाची आणि मोलाची भूमिका पार पाडत असते, मानवी जीवनाला आकार देण्याच काम हे महाविद्यालय करत असते, त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, महाविद्यालयात आपण यायला पाहिजे व शिक्षण घेऊन आपल्या जीवनाची दिशा ठरवायला पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उप-प्राचार्य डॉ. बी के मगर यांनी विद्यार्थांना महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती माझी विद्यार्थांना/पालकांना दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत, शिस्त, अभ्यासाबरोबरच व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालय करत असलेल्या प्रयत्नांवर त्यांनी प्रकाश टाकला.

माझी विद्यार्थी म्हणून प्रा रामेश्वर बारगळ यांनी मत व्यक्त करत असतना सांगितले की ,आज माझ्या जीवनात स्थिरता निर्माण झाली ते केवळ या महाविद्याल्यामुळेच, मी या महाविद्यालयाचा कायम ऋणात राहू इच्छितो, दुसरे माजी विद्यार्थी वाणिज्य विभागाचे श्री. अनिल मोरे यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की महाविद्यालयात दररोज उपस्थित राहणे अत्यंत गरजेचे आहे त्यामुळे आपल्याला आयुष्यात योग्य निर्णय घेता येतात व समाजामध्ये सध्या काय चालू आहे त्याबद्दलचे देखील ज्ञानमिळते, विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचा त्रिसूत्री संवाद आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या समस्या, शैक्षणिक प्रगतीचे मुद्दे व भविष्यातील करिअर मार्गदर्शन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थी पालक यांचे मान्यवराच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समितीचे सदस्य डॉ. अहिरराव राकेश यांनी केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे डॉ.सीमा काशीद, डॉ.रामचंद्र झाडे, डॉ.गोविंद बोरसे, डॉ.प्रतिभा अहिरे, डॉ. डी.डब्ल्यू शिंदे,डॉ.बी एच.गायकवाड, डॉ. बी के मगरे, डॉ पी एस आव्हाळे, डॉ डी टी साखरे, डॉ. पी के संघई,डॉ .अनिल क्षीरसागर , डॉअतिश मेहत्रे,प्राअमोल सरवदे, प्रा.पी जी चव्हाण, प्रा .प्रगती चव्हाण प्रा शीतल बारगळ, डॉ.अलका गडकरी, डॉ ठाकूर मॅडम तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## निधन वार्ता



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** कै केराबाई दगडू मेंगाळ वय (९४) रा. निरगुडी बु ठाकरवाडी ता खुलताबाद जि छ संभाजीनगर यांचे दिनांक ३ ऑक्टोबर वार शुक्रवार संध्याकाळी ५.०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी ११.०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांचा दशक्रिया विधी कार्यक्रम दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ वार रविवार रोजी सकाळी ठेवण्यात आला आहे.

त्यांच्या पश्चात दामू दगडू मेंगाळ सुक्राम दगडू मेंगाळ वाळुबा दगडू मेंगाळ ढवळीराम दगडू मेंगाळ चार मुले व राहुबाई भुतांबरे मीना पथवे रानुबाई पथवे तीन मुली लक्ष्मीबाई मेंगाळ अंजनाबाई मेंगाळ सोमाबाई मेंगाळ लहानु मेंगाळ या चार सुना व जावई नातवंडे असा परिवार आहे सर्व मेंगाळ परिवारावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ ऑक्टोबर २०२५


## रोहा एक गाव



कोकणाच्या कुशीत जन्मलेलं
निसर्ग सौंदर्यात नटलेलं
कुंडलिका नदीकाठी वसलेलं
६२ ग्रामपंचायतीचं हृदय असलेलं
रायगड जिल्ह्यातल एक गाव
रोहा आहे त्याच नाव...

गावाच्या पश्चिमेला
हनुमान टेकडीच्या पायथ्याला
श्री धावीर महाराज
आराध्य गावाचं
नवरात्र उत्सव
समद्या गावाचा उत्सव
दसऱ्याच्या दुसऱ्या दिवसाला
सारं गाव येई
धावीर महाराजांच्या पालखीला

साऱ्या गावाच्या दारा दाराला
धावीर महाराज जाई भक्तांच्या भेटीला
पालखी सोहळ्याच्या उत्सवाला
देई पोलीस सहस्त्र सलामी पालखीला
कालिका माता, बहिरी बुवा, वाघ बाप्पा
मागे उभे तीन देवता आशीर्वादाला
अंगरक्षक चेडा देव पुढे उभा रक्षणाला
रायगड जिल्ह्यातल एक गाव
रोहा आहे त्याच नाव...

भात शेती आमची
माय माती आमची
अवचित गड, घोसाळे किल्ला
रुबाबात उभा गावात
असा निसर्ग संपन्न
श्रद्धेचे हृदय स्थान
मायाळू माणसांच हे गाव
रायगड जिल्ह्यातल एक गाव
रोहा आहे त्याच नाव...



**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं:- ८८८८६०६०६८**



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## शिवाजी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे उदघाटन



**कन्नड : (प्रतिनिधी )** येथील शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे या शैक्षणिक वर्षातील उदघाटन संत तुकाराम महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. सुधीर पवार यांच्या हस्ते संपन्न झाले.

(ता. १) कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. बी . के . मगर होते. व्यासपीठावर नॅक समन्वयक डॉ. विजय मातकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. आर.के. पवार, डॉ. संजय भालेराव यांची उपस्थिती होती. यावेळी व्यक्तिमत्व विकास व युवक या विषयावर डॉ. सुधीर पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

त्यांनी व्यक्तिमत्व म्हणजे काय ? व्यक्तिमत्वाचे प्रकार, व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक गुण ? संवाद कौशल्ये, आदी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते.

आजीवन शिक्षण व विस्तार सेवा केंद्राच्या उपक्रमात सहभागी होवून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक विकासाबरोबरच आपला व्यक्तिमत्व विकास साधून जीवनात यशस्वी व्हावे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. बी.के. मगर यांनी केला. ते म्हणाले की, विद्यार्थ्यानी नियमित महाविद्यालयात आले पाहिजे.

अभ्यासाबरोबरच महाविद्यालयातील उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे. सामाजिक जाणिवेचा व सामाजिक बांधिलकीचा माणूस घडविण्यासाठी हे विभाग महत्वाचे योगदान देत असतात.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रामचंद्र झाडे यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. या विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. सहकार्यक्रम अधिकारी डॉ. आर.के. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## प्राण्यांची सहल

जंगली प्राण्यांची सहल
एका शहरात आली
दबकत दबकत
भव्य जत्रेत शिरली

भुकेल्या सशाला
खाण्याची सुटली हाव
एका हॉटेलात शिरून
पापडावर मारला ताव

उडी मारून कांगारू
आकाश पाळण्यात बसला
अगडबंब शरीरामुळे
हत्तीचा प्रयत्न फसला

सिंह एका खाणावळी
तजेवण करून आला
पैसे मला नकोत
दुकानदार पुरता भ्याला

कोल्हा ऐटीत फिरे
डोळ्याला गॉगल लावून
गाढव गडबडा लोळे
तिखट भजी खाऊन

फळवाल्याची नजर चुकवून
माकडाने मटकावली केळी
पायात चप्पल घालून
मिरवू लागली शेळी

जत्रेत दिसला प्राण्यांना
एक पोलिस शिपाई
हातातील बंदुक पाहून
पळायची सुटली घाई


**रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**


# डिजिटलच्या काळात विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी विशेष कार्यशाळा




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** काळानुरूप विद्यार्थ्यांमध्ये मानसिक-बौद्धिक एकाग्रता, आत्मभान, आंतरिक ऊर्जा व ज्ञानसंपन्न बनायचे असेल तर या तंत्रज्ञानाच्या युगात मुलांच्या मेंदूची कार्यप्रणाली व विकास होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन बीड येथील स्मार्ट ब्रेन टेक्नो सर्विसेस फाउंडरचे रो. डॉ. जितेंद्र बोरा यांनी केले.

रोटरी क्लब मुरूम सिटी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने पालक आणि विद्यार्थ्यांसाठी आयोजित शुक्रवारी (ता. 3) रोजी विशेष कार्यशाळेत ते व्याख्यात म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गोविंद इंगोले होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कल्लप्पा पाटील, मुख्याध्यापक हरी शंके आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. जितेंद्र बोरा म्हणाले की, पेरेंटिंग व ब्रेन डेव्हलपमेंट या विषयावर मुलांच्या मेंदूची कार्यप्रणाली व विकास, जन्मजात गुण ओळखण्याचे तंत्र कौशल्य, ब्रेन मॅपिंग टेस्ट (मेंदूची चाचणी), स्मरणशक्ती, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढविण्याचे उपाय, सोशल मीडिया ॲडिक्शन व आळस यावर उपायोजना विस्ताराने चित्रफितीद्वारे मांडल्या.

या कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. महेश मोटे, गोविंद पाटील, शिवशरण वरनाळे, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश स्वामी, डॉ. प्रिती चिलोबा, संध्या वाकडे, कमलाकर मोटे, सुनिल राठोड, मल्लिकार्जुन बदोले, बाबासाहेब पाटील, प्रकाश रोडगे, राजेंद्र वाकडे, प्रा. विनय इंगळे, गजानन उपासे, किशोर कांबळे, रोहन हराळकर, प्रकाश चव्हाण, इंगोले बालाजी, प्रसाद इंगोले आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शेषराव राठोड तर आभार कल्लप्पा पाटील यांनी मानले. या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील दहावीच्या मुली, कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी-बारावीचे विद्यार्थी व पालकांचा उस्फुर्त सहभाग राहिला






## प्रथम सत्रामध्ये सातत्याने उपस्थित राहिल्याबद्दल विद्यार्थ्यांना साहित्य देऊन गौरविण्यात आले



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थी शशांक नलावडे व प्रतीक मगरे हे प्रथम सत्रामध्ये सातत्याने उपस्थित राहिल्याबद्दल त्यांच्या वर्गशिक्षिका श्रीमती मयुरी इंगळे यांच्या हस्ते शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. दरम्यान, इयत्ता आठवीच्या वर्गशिक्षिका श्रीमती हर्षाली वानखेडे यांनी एन.एम.एम.एस. परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना स्वखर्चाने अभ्यासपुस्तके उपलब्ध करून दिली.

त्यांच्या या उपक्रमाचे मुख्याध्यापकांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ ऑक्टोबर २०२५


## माळीवाडा येथे बच्चुकडू यांचे जल्लोषात स्वागत

**दौलताबाद (जावेद अहेमद)** : माळीवाडा येथे बच्चुकडू यांचे जल्लोषात स्वागतप्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चुकडू यांचे माळीवाडा गावात ग्रामस्थांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

गावकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने हार शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य कडू कीर्तिकर, कृष्णा मुळे, प्रवीण बर्डे, माजी सदस्य सुधाकर हेकडे, सुभाष मुळे, सुरेंद्र जगधने, बाळू गाजरे कुनाल राऊत,प्रहार संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्षा वदना मुळे (पाडे ताई), तसेच कृष्णा गोरखनाथ मुळे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलांच्या कबड्डी स्पर्धेमध्ये नवजीवन आंबा तांडाचे वर्चस्व



**कन्नड (कृष्णा शिंदे)** : तालुका शालेय कबड्डी मुलांच्या स्पर्धेचे उद्घाटन कन्नड ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ रामचंद्र पवार यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन करण्यात आले.

यावेळी तालुका खेर्डा संकुल समिती सदस्य व मार्गदर्शक प्रवीण शिंदे तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे स्वामी प्रणव नंद माध्यमिक शाळा कालीमठचे मुख्याध्यापक बी एस पाटील शाळेचे क्रीडा शिक्षक किशोर जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ रामचंद्र पवार यांनी खेळाडूंना शालेय जीवनामध्ये खेळायला खूप महत्त्व आहे आपलं शरीर हे निरोगी राहत आयुष्य जगण्यासाठी खेळ खेळणं खूप महत्त्वाचं आहे आणि खेळाडूंना शुभेच्छा दिल्या स्पर्धेचा निकाल १४ वर्षाखालील मुलांचा संघ विजेता संघ महात्मा फुले हायस्कूल पिशोर दुतीय जि प प्राथमीक शाळा पांगरा इंग्लिश स्कूल देवगाव रंगारी १७ वर्षाखालील विजेता संघ नवजीवन आश्रम शाळा आंबा तांडा दुतीय वसंतराव नाईक माध्यमिक शाळा तेलवाडी १९ वर्षाखालील विनायकराव पाटील महाविद्यालय कन्नड दुतीय नवजीवन ज्युनिअर कॉलेज अंबातांडा या सामन्याचे पंच म्हणून कडूबा चव्हाण राकेश निकम प्रशांत नवले सचिन शेळके संदीप बागुल देवरे सर बुरुकुल सर आदींनी केले.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187


YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903


## समकालीन वास्तवाची सम्यक दृष्टी देणारी कविता : 'माती म्हणे आभाळाला'




'कवी एक सृजनशील भावनेचा आविष्कार असतो.तो मुक्त व्यक्त होतो.त्याचे मन अल्लड असते.तो फक्त शोधत असतो दुःखाचे मुळ.आणि शब्दांशी असते त्याचे कुळ.जात धर्म पंथ या वल्गनेच्या पसाऱ्यात तो नाही अडकत.म्हणून तो तथागत बुद्धांच्या सम्यक विचारांचा प्रज्ञावंत पाईक होतो आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचेहाती घेतो निर्धारची धारदार शब्दशस्त्र."माझ्या लहानपणी भर उन्हाळ्यात सारी माणसं रानावनात कामाला गेल्यावर आमच्या घराच्या भिंतीला खेटून उभा असलेला पिंपळवृक्षाने त्याच्या नितळ सावलीत आम्हा लेकरांना आजोबा सारखं सांभाळलं त्यापिंपळवृक्षास".ही सविनय ऋणाईची अर्पणपत्रिका.

तथागतांच्या पंचशील तत्त्वांचे पालन आहे.असे सर्व गोतावळ्यातील स्नेही सन्मित्र कवी गझलकार गणेश खरात यांच्या शासन अनुदान मान्यतेतून प्रकाशित झालेला "माती म्हणे आभाळाला"कवितासंग्रह म्हणजे, समकालीन वास्तवाचे सम्यक दृष्टी देणारी कविता.

ज्या भयावह जगण्याच्या दुनियेत संविधान विधिज्ञ कायद्याचेपंडित श्रध्देय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे दिव्य तेजस्वीत्व वाचन अंगीकृत करून हा सर्वहरा वेदनेचा सम्यक सकारात्मक समर्पक सृजनशील भावनेचा आविष्कार म्हणजे कवी गणेश खरात यांची कविता.डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांने समाज जागा झाला.हातात लेखणी व मस्तकात विचारांची मागणी आली.बहुजनांचे मळे बहरले.कवी लिहितो,"भाकरीचा प्रश्न सुटल्यावर सुखाचा सुस्कारा सोडत सारे स्वप्नवत भासतं होते..

खिशाला पेन लाऊन,हलकस स्मित करीतमला बाबासाहेब दिसत होते.".(पृष्ठ 96)या कवितेने आंबेडकरी विचार आचार संहितेचा माणूस घडविणारे शस्त्र 'शिका, संघटीत व्हा संघर्ष करा'.जो अटळ आहे.या समकालीनात आज सर्वहरा समाजाला जान व भानआले आहे.माती आभाळाशी नातं ही विचारांची नीती व माती या आभाळाला म्हणते..तू बदलू नको सरड्या सारखे रंग.रंग ही बेरंग होऊ देणारं नाही.इथल्या जीवांसाठी.ही मातीची महती या कवितेने दिली आहे.ओला कोरडा दुष्काळ हे अनेक युगांचे संचित आहे.याला कारणीभूत माणुसचं.कारण त्याला त्याचे सुख कळाले नाही.शांती त्यांने अशांती होऊन गेली आहे.माणसाचा हलकट स्वार्थ.माती ही आभाळाची मायचं आहे.ती आभाळाला विनवणी करते.तू प्रत्येक हंगामात वेळवर येत जा.पण ऋतूचे चक्र माणसांच्या अनितीने बदले आहे.पाणी,झाडे,डोंगर,सागर मातीचा हीअति प्रमाणात वापर तो त्याच्या स्वार्थ गोष्टी करू लागला म्हणून मानवाला निसर्गाच्या या भयंकर चक्राला सामोरे जावे लागते आहे.ऋतूचा ताळमेळ राहिला नाही.

सारं नी सगळेचं अति होतंय आहे.कवी लिहितो, तत्कालीन परिस्थिती."कुठं दिसना हिरवळ,होई उन्हामध्ये आग.रानं झालंय ओसाड,कशी सोसायची धग यावं हळूच सरींनी,वाजवीत ढगढोल माती म्हणे आभाळाला, थोडं मनातलं बोल "(पृष्ठ 26) 'एक काळ होता,बाळा, गझल माझी, जगणं घडवित आहे,कोरड्या डोळयात स्वप्न,पेचात गावं आहे.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध हाच आहे की, माणूस माणूसकीला दुरवला आहे.

आपल्यावर अनेक मातांचे ऋण आहे त्यात 'माते रमाई'विषयी ऋणाई व्यक्त केली आहे.मन,'मातीतला माणूस,माती म्हणे आभाळाला, डायरीतल्या किरकोळ नोंदी,सुखाचा चांदणं:माहेर, उमटते कवितेचे ओळ, आठवणींच्या फांद्या, जिंदगीवर भार आहे,या मुक्त कविताआणि एक मतला दोन शेर या गझलेच्या अति उच्च टोकाचे चिंतन आशय ही कविता देऊन जाते जसे,"सांजवेळी ऐकतो,मी आर्त गाणी.वाटते मज दुःखही दिलदार आहे जीवनावर भाष्य ज्यांचे अमर झाले गौतमाचे तत्व त्याचा सार झाले....(पृष्ठ 33)

माणसांच्या क्षणिक सुखाची लालसा व समाज परिवर्तनाचा सामाजिक वसा व वारसा या कवितेमधून परिप्रेक्ष्यात अतिशय उत्तम आशय घेऊन सृजनशील भावनेचा दस्तऐवज ही कविता संयत विद्रोही सांस्कृतिक मूल्य देऊन जाते.या भारतावर्षाला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'सविधान'दिले हिच सम्यक विचारांची माती आभाळभर झाली. गणेश खरात आपल्या काव्य प्रतिभेने गझल व मुक्तछंद,अष्टाअक्षरी या कवितेचा आत्मा घेऊन सृजनशीलतेने माती म्हणे आभाळाला हे शिर्षक सर्वव्यापक समष्टीची प्रार्थना करते.या कवितेचा मुळ आत्मा हा मानवी मूल्यांची बंधुत्वाची व आजच्या माणुसघान्या प्रवृतीची कानपिचक्या देतो.

या कवितेचेप्रतिभा व प्रतिमांच्या माध्यमातून ही कविता अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विवेचक झाली आहे.कवी गणेश खरात यांच्या कवितेवर अतिशय कवी हबीब भंडारे यांची चिंतन चिकित्सक आशय संपन्न प्रस्तावना ते लिहितात "कवी गणेश खरात 'यांचा माती म्हणे आभाळाला'हा पहिला कवितासंग्रह असला जरी अनुभूती, मूल्यात्मक, अभिव्यक्ती, जीवनदायी विचार, संवेदनाशीलता, संवेदना, आशयाच्या दृष्टीने संग्रहातील कविता अतिशय सकस व महत्त्वपूर्ण आहे" ख्यातनाम चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे मुखपृष्ठ म्हणजे माय,माती, मातेचे चरण कमल,उगवून येणार कोवळा कोंब,या आशय गर्भित मूल्य देणारा लक्षवेधी ठरावा ही सविनय शुभेच्छा.



माती म्हणे आभाळाला:-
(कवितासंग्रह)
**कवी : गणेश खरात**
प्रकाशिका:-सौ.विद्या मुरलीधर नाले
अनघा प्रकाशन ठाणे (पुर्व)
मुखपृष्ठ:-श्रीधर अंभोरे
प्रथम आवृत्ती:-दि.30सप्टेंबर 2025
मूल्य:-48 रूपये
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

# जागतिक शिक्षक दिन : बुद्धकालीन गुरू व आधुनिक शिक्षक

मानव इतिहासातील प्रत्येक युगात शिक्षक हा समाजाचा केंद्रबिंदू राहिला आहे. ज्ञान, संस्कार, मूल्ये, नैतिकता आणि जीवनाला दिशा देणारा दीपस्तंभ म्हणजे शिक्षक. म्हणूनच 5 ऑक्टोबर हा दिवस जगभर ‘जागतिक शिक्षक दिन’ म्हणून साजरा केला जातो. युनेस्कोने 1994 साली या दिवसाची सुरुवात केली आणि तेव्हापासून संपूर्ण जगात शिक्षकांच्या योगदानाचा गौरव होत आहे. पण शिक्षक संकल्पना समजून घेण्यासाठी आपण केवळ आधुनिक काळात न थांबता प्राचीन काळात, विशेषतः बुद्धकालीन परंपरेत डोकावले पाहिजे.

कारण त्या काळातील शिक्षण व शिक्षकाची भूमिका आजच्या काळातील शिक्षकांना प्रेरणा देणारी ठरते. बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ या दोन परंपरांचा संगम म्हणजेच खऱ्या अर्थाने शिक्षक दिनाचा सखोल अर्थ होय. बुद्धकाल हा भारतीय समाजजीवनातील बौद्धिक आणि सामाजिक परिवर्तनाचा कालखंड मानला जातो. त्या काळातील शिक्षक म्हणजे गुरु हे शिष्यांना फक्त ग्रंथपठण शिकवणारे नव्हते, तर ते जीवनमूल्यांचे शिल्पकार होते.

गुरुकुल प्रणालीमध्ये शिष्य आपले संपूर्ण जीवन गुरुंच्या मार्गदर्शनाखाली व्यतीत करीत असत. ज्ञानासोबत संयम, सत्य, प्रामाणिकपणा, करुणा आणि समता यांचे शिक्षण दिले जाई. बुद्धकालीन शिक्षकांचा केंद्रबिंदू म्हणजे समाजहित. ते फक्त वैयक्तिक यशावर भर देत नसून शिष्यांच्या माध्यमातून संपूर्ण समाजाची प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत.गौतम बुद्ध स्वतः सर्वोत्तम शिक्षक म्हणून ओळखले जातात. त्यांनी ज्ञानसंपादनाची नवी दृष्टी दिली. "अप्प दीपो भव" म्हणजे स्वतःचा प्रकाश स्वतः व्हा, हा त्यांचा उपदेश शिष्यांना आत्मनिर्भरतेचे धडे देणारा होता. त्यांनी कधीही अंधानुकरणाची शिकवण दिली नाही; उलट विवेकबुद्धी, तपासणी, शंका आणि संवाद यांवर आधारित शिक्षणपद्धती त्यांनी रुजवली.

शिष्यांना त्यांनी सांगितले की "तुम्ही माझ्या शब्दांवर आंधळा विश्वास ठेवू नका, विचार करा, अनुभव घ्या आणि मग स्वीकारा." हीच खरी गौतम बुद्धांची वैज्ञानिक वृत्ती होती. या विचारसरणीमुळे शिक्षकाची भूमिका म्हणजे तर्कबुद्धी जागवणारा आणि विवेक विकसित करणारा असा होती. बुद्धकालीन विहार आणि विद्यापीठे ही शिक्षक-शिष्य संबंधांची केंद्रे होती. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला यांसारख्या विद्यापीठांत शिक्षक केवळ विद्वान नव्हते तर समाजदूत होते.

शिष्यांना ग्रंथपठणाबरोबर समाजसुधारक मूल्यांचे धडे दिले जात. पंचशील, अष्टांगिक मार्ग, करुणा आणि अहिंसा या बौद्ध मूल्यांवर आधारित शिक्षण हीच त्या काळातील शिक्षकांची खरी देणगी होती. शिक्षण हे फक्त ज्ञानसंपादनासाठी नसून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि मानवी जीवन अधिक सुंदर करण्यासाठी आहे, हेच तत्त्व ते शिकवीत.आजच्या आधुनिक काळात शिक्षकांची भूमिका बदलली असली तरी तिचे सार तेच आहे. आज माहितीच्या युगात प्रत्येकाकडे ज्ञानसाधने सहज उपलब्ध आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण इत्यादी. या सर्वांमुळे शिक्षकाचे काम केवळ माहिती पुरविण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही.

शिक्षकाला आता माहितीचे ज्ञानात, आणि ज्ञानाचे शहाणपणात रूपांतर करून विद्यार्थ्यांना योग्य दिशा द्यावी लागते. डिजिटल युगात शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकवणारा नसून मार्गदर्शक, समुपदेशक, प्रेरणादाता आणि मूल्यसंस्कारक बनला पाहिजे. आधुनिक काळातील शिक्षकांची जबाबदारी बुद्धकालीन गुरूंहून अधिक व्यापक आहे. कारण आजची मुले केवळ परीक्षेतील गुणांसाठी शिकत नाहीत, तर त्यांना जागतिक स्पर्धेत टिकून राहायचे आहे. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांत सर्जनशीलता, नवोन्मेष, तर्कशक्ती, संवादकौशल्य, नेतृत्वगुण आणि मानवी मूल्ये रुजवावी लागतात.

जसे बुद्धकालीन शिक्षकांनी शिष्यांना प्रश्न विचारायला, संवाद साधायला आणि सत्य शोधायला प्रवृत्त केले, तसेच आजचे शिक्षक विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार करायला आणि समस्या सोडवायला शिकवतात.बुद्धकालीन संदर्भ आणि आधुनिक संदर्भ यांची तुलना केली तर अनेक साम्यस्थळे दिसून येतात. बुद्धकालीन शिक्षकांनी समाजातील अंधश्रद्धा, अन्याय आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाचा वापर केला. आजचे शिक्षकही समाजातील पर्यावरण समस्या, हिंसा, डिजिटल व्यसन, सामाजिक माध्यमांचा गैरवापर, लिंगभेद, असमानता यांसारख्या प्रश्नांवर विद्यार्थ्यांना संवेदनशील करतात. त्या काळात शिक्षकांनी शिष्यांना करुणा आणि समतेचे धडे दिले, तर आज शिक्षक विद्यार्थ्यांना मानवाधिकार, लोकशाही मूल्ये आणि शाश्वत विकास यांची जाण देतात.

तथापि, आधुनिक शिक्षक अनेक आव्हानांशी सामना करीत आहेत. ग्रामीण भागातील शाळांची अपुरी साधनसामग्री, करारावर काम करणाऱ्या शिक्षकांची असुरक्षितता, प्रशासकीय कामाचा ताण, डिजिटल साधनांच्या अभावामुळे शिकवण्यातील अडचणी यामुळे शिक्षकांचे कार्य जड झाले आहे. तरीही जे शिक्षक आपले काम ध्येय मानतात, तेच खऱ्या अर्थाने बुद्धकालीन गुरुंच्या वारशाला न्याय देतात. जागतिक शिक्षक दिनाचा खरा अर्थ म्हणजे शिक्षकांच्या योगदानाची दखल घेणे आणि त्यांच्या कार्याला योग्य सन्मान देणे. बुद्धकालीन संदर्भ सांगतो की शिक्षक हा केवळ माहिती देणारा नसून मूल्यांचा वाहक आहे.

आधुनिक संदर्भ सांगतो की शिक्षकाला नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत विद्यार्थ्यांना सुसंस्कारित नागरिक घडवावे लागते. म्हणूनच आज आपल्याला या दोन्ही परंपरांचा संगम साधावा लागेल.

५ ऑक्टोबर रोजी असणाऱ्या जागतिक शिक्षक दिनानिमित्त आपण ठरवायला हवे की आपल्या शिक्षणव्यवस्थेत बुद्धकालीन मूल्यांचा व आधुनिक तंत्रज्ञानाचा मेळ घालावा. शिक्षकांना योग्य प्रशिक्षण, संसाधने, मानवी सन्मान आणि प्रेरणा द्यावी. कारण राष्ट्राचे भविष्य शिक्षकांच्या हातात आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा वैज्ञानिक, नेता, समाजसुधारक, विचारवंत होणार आहे.

त्यामुळे शिक्षकाची भूमिका केवळ वर्गखोल्यापुरती मर्यादित नसून समाजपरिवर्तनाची आहे. म्हणूनच आपण या दिवशी केवळ औपचारिक कार्यक्रमापुरते न थांबता शिक्षकांना खरे समर्थन द्यावे, त्यांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहावे आणि शिक्षण अधिक न्याय्य, मूल्याधिष्ठित आणि समाजाभिमुख करण्यासाठी प्रयत्न करावे. बुद्धकालीन गुरूंनी दिलेली प्रेरणा आणि आधुनिक शिक्षकांचे ध्येय हे दोन्ही एकत्र केल्यासच मानवतेचे खरे कल्याण साध्य होईल..



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
ईमेल –
bagate.rajendra5@gmail.com

## ०५- औरंगाबाद (मराठवाडा) विभाग पदवीधर मतदार संघ नम्र आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** पदवीधर बंधू आणि भगिनींनो, नमस्कार, मी भाई चंद्रकांत चव्हाण मराठवाडा शिक्षक संघ आपणांस नम्र आवाहन करतो की, औरंगाबाद पदवीधर मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असुन पदवीधर मतदारांची नव्याने मतदार नोंदणी सुरू झाली आहे. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीची मतदार यादी दर वेळी नव्याने तयार करण्यात येते. त्यामुळे यापूर्वीच्या निवडणुकीतील मतदार यादीत आपले नाव असले तरी ते रद्द होतात म्हणून पुन्हा नव्याने नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. 👉 पात्रता● मतदार हा मराठवाडयातील छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड बीड, लातूर, धाराशीव या ८ जिल्ह्यातील कोणत्याही वयाचा व कोणत्याही शाखेचा पदवीधर व रहिवासी असावा.● १ नोव्हेंबर २०२२ पुर्वीचा पदवीधर असावा👉 नोंदणी फॉर्म डाउनलोड करा:🔗 https://ceoelection.maharashtra.gov.in/Downloads/DownloadForms/Form-१८.pdf पदवीधर मतदार बंधू भगिनींनो मतदानाचा तुमचा हक्क बजावण्यासाठी तुमचे आणि तुमच्या मित्र नातेवाईकांचे फॉर्म भरून आपल्या तालुक्याच्या तहसील कार्यालयात जमा करावे. या बाबत आपणांस काही अडचण असल्यास आम्हाला संपर्क करावा, आम्ही ती दूर करू. आपण सर्वांनी मतदार नोंदणी करून परिवर्तनाच्या ह्या लढ्यात सहभागी होऊ या...!!!▯ नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे १) भारतीय निवडणुक आयोगाचा नमुना अर्ज क्रं १८२) भारतातील कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी प्रमाणपत्र किंवा अंतिम वर्षाची मार्कशीट गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत ३) पासपोर्ट आकाराचा फोटो ४) आधार कार्ड व मतदान ओळखपत्राची झेरॉक्स प्रत ५) विवाहित महिलांकरिता लग्नाचे प्रमाणपत्र / राजपत्र गॅझेट / पॅन कार्ड ◇ नोंदणीची मुदत :- ०१ आक्टोंबर २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ ◇ नोंदणीचे ठिकाण :- आपल्या तालुक्याचे तहसील कार्यालय ❖ प्रत्येक पदवीधराचा आवाज महत्त्वाचा आहे. ❖ आपला हक्क बजवा व लोकशाही मजबूत करा

**आपला**
**भाई चंद्रकांत चव्हाण**
९८९०५७८७५१ मराठवाडा शिक्षक संघ छत्रपती संभाजीनगर

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ ऑक्टोबर २०२५


# अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळास कायदेशीर दृष्ट्या कसे हाताळावे याचे केस कायदे शासनास मार्गदर्शक : राजेंद्र दाते पाटील

सद्य स्थिती अत्यंत भयावह असुन अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळस कायदेशीर दृष्ट्या सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शन करणारे निकाल दिले असुन अशा स्थितीस कसे हाताळावे याचे न्याय निवाडे व केस कायदे अत्यंत फायद्याचे ठरणार असल्याचे प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

त्यांनी नमुद केले की,विशेषतः अतिवृष्टीमुळे होणाऱ्या दुष्काळाला संबोधित करत नाही. त्याऐवजी, न्यायालये विद्यमान कायदेशीर चौकटींद्वारे हवामान बदलाच्या परिणामांना, जसे की अतिवृष्टी घटनांना हाताळतात. केस कायदा प्रामुख्याने आपत्ती व्यवस्थापना साठी जबाबदारी,अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानासाठी विमा दावे आणि पाण्यावरील मूलभूत हक्कांचे समर्थन करण्याशी संबंधित आहे.कायदेशीर युक्तिवादांवर प्रभाव टाकणारे वैज्ञानिक निष्कर्ष मुसळधार पाऊस आणि दुष्काळ यांच्यातील स्पष्ट संबंध प्रदान करतात. अति, तीव्र पावसामुळे "फ्लॅश दुष्काळ" होऊ शकतो जिथे पाणी माती आणि भूजलात प्रवेश करण्याऐवजी आणि पुनर्भरण करण्याऐवजी वेगाने वाहून जाते असेही अभ्यासु प्रतिपादन जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

भारतातील महत्त्वाचे केस कायदे स्वराज अभियान विरुद्ध भारतीय संघ (२०१६):या ऐतिहासिक प्रकरणात, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दुष्काळाला सरकारच्या प्रतिसादासाठी जबाबदारीचे मानक स्थापित केले. न्यायालयाने आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत दुष्काळ ही एक आपत्ती आहे असा निर्णय दिला आणि केंद्र आणि राज्य सरकारांना मदत देण्यासाठी वेळेवर दुष्काळ जाहीर करण्याचे आदेश दिले.

नर्मदा बचाओ आंदोलन विरुद्ध भारतीय संघ (२०००): सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की पाण्याचा अधिकार हा भारतीय संविधाना च्या कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकारात अंतर्भूत असलेला मूलभूत अधिकार आहे. या आणि इतर खटल्यांनी हे सिद्ध केले आहे की पाणी हे सार्वजनिक ट्रस्टमध्ये ठेवलेले एक सामुदायिक संसाधन आहे, जे नैसर्गिक जलसंपत्तीचे संरक्षण करण्याची राज्यावर कायदेशीर जबाबदारी आहे.

हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस (प्रा.) लि. विरुद्ध पेरुमट्टी ग्राम पंचायत (२००५): केरळ उच्च न्यायालयातील हा खटला एका बहुराष्ट्रीय महामंडळाविरुद्ध स्थानिक समुदायाच्या पाण्याच्या अधिकाराबाबत होता. न्यायालयाने असे आढळून आले की कंपनीने भूजलाचा अतिरेकी उपसा केल्याने पाण्याची टंचाई निर्माण झाली, तो जनतेच्या स्वच्छ पाण्याच्या अधिकाराच्या किंमतीवर चालू राहू शकत नाही. एम.सी. मेहता विरुद्ध कमलनाथ (१९९७): या प्रकरणात, सर्वोच्च न्यायालयाने भारतीय पर्यावरण कायद्याला सार्वजनिक ट्रस्ट सिद्धांत लागू केला.

या निकालात असे घोषित करण्यात आले की राज्य हे जंगले आणि नद्यांसारख्या नैसर्गिक संसाधनांचे विश्वस्त आहे, जे जनतेच्या मोफत वापरासाठी आहेत आणि खाजगी मालकीमध्ये रूपांतरित केले जाऊ शकत नाहीत.विमा दावे आणि करार अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कराराच्या वादां वरही न्यायालयांनी काम केले आहे. ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध जे.के. सिमेंट वर्क्स (२०२०): भारतीय सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान मानक आग आणि विशेष संकट विमा पॉलिसी अंतर्गत "पूर आणि पूर" म्हणून पात्र ठरते. यामुळे पूर नुकसान म्हणजे काय याचा अर्थ लावणे व्यापक झाले, विमा कंपन्यांना मुसळधार पावसामुळे होणाऱ्या पाण्याच्या साठ्यासाठी जबाबदार धरले. गुजरात राज्य विरुद्ध विजय मिस्त्री कन्स्ट्रक्शन आणि राजकमल बिल्डर्स

प्रायव्हेट लिमिटेड (तारीख उपलब्ध नाही): एका न्यायाधिकरणाने असा निष्कर्ष काढला की "अभूतपूर्व पाऊस" सवलतीच्या कराराखाली फोर्स मॅजेऊअर घटना म्हणून पात्र ठरू शकतो. यावरून असे दिसून येते की करार कायद्यात, प्रकल्पाच्या वेळेत व्यत्यय आणणाऱ्या मुसळधार पावसा सारख्या घटना कायदेशीररित्या ओळखल्या जाऊ शकतात, जे कराराच्या विशिष्ट अटींवर अवलंबून असतात. "फ्लॅश दुष्काळ" चे कायदेशीर परिणाम मुसळधार पावसानंतर येऊ शकणाऱ्या फ्लॅश दुष्काळांशी संबंधित कायदेशीर समस्या अजूनही विकसित होत आहेत. अचानक येणारा दुष्काळ म्हणजे अचानक येणारा दुष्काळ, उच्च तापमान आणि मुसळधार पावसानंतर जलद वाहून जाणारे पाणी यासारख्या घटकांमुळे उद्भवणारा तीव्र दुष्काळ असतो, ज्यामुळे माती आणि भूजलाचे पाणी पुन्हा भरण्यापासून रोखले जाते. सरकारी कर्तव्य: स्वराज अभियान विरुद्ध भारतीय संघराज्य यातील तत्त्वे लागू होतील,ज्यामुळे दुष्काळा च्या परिस्थितीत वेळेवर आणि प्रभावी आपत्ती व्यवस्थापन प्रतिसादांसाठी सरकार जबाबदार असेल.

विमा दावे: ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड विरुद्ध जे.के. सिमेंट वर्क्स यासारख्या कायदेशीर उदाहरणांमुळे,अचानक येणाऱ्या दुष्काळामुळे जमिनी तील ओलावा कमी होणे आणि शेतीच्या नुकसानीशी संबंधित पिकांचे नुकसान किंवा माल मत्तेचे नुकसान झाल्याच्या दाव्यांचे समर्थन होऊ शकते. आंतरराज्यीय पाणी वाद: कर्नाटक आणि तामिळनाडू मधील कावेरी पाणी वादात पाहिल्याप्रमाणे, अचानक येणारा दुष्काळ आंतरराज्यीय पाणी वाद वाढवू शकतो, जिथे न्यायालयीन निर्णयांमध्ये मान्सूनच्या पावसाची वेळ आणि तीव्रता हे प्रमुख घटक आहेत असे कायदेशीर व अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव जेष्ठ आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.



**राजेंद्र दाते पाटील**
**मो. क्र. ९७६७४ ०१६६५**

# सांग ना आई

गावापासून कोसो दूर
लेकी पासून आले दूर
फुलासारखं बाळ माझं
मी दूर गेल्या सुकून गेलं

किती समजदार बाळ माझं
आई शिवाय कसं राहतं
दूर असलेलं बाळ माझं
स्वप्नात येऊन हाक मारत
गोड गोड गप्पा करत
हळूच मला समजून सांगतं

माझं बालपण हिरावून तू
माझ्यापासून दूर गेली
आता तर तुझी मला खरी
गरज होती आई
माझं बालपण, तुझं आईपण
हेच तर तुझं बाईपण आई
माझ्या भविष्यासाठी
तू आज दूर गेली

उद्याही भविष्यात पुन्हा
मला सासरी पाठवशील आई
तेव्हा ही तू माझ्यापासून
मायलेकीच्या नात्यापासून
तू पुन्हा मला दूर नेशील आई

मग कशी ग आई तू
असून नसल्या सारखी झाली
फोनवरुन आवाज तेवढा
ऐकून मी मनाला समजावते आई
सुट्ट्यामध्ये तेवढं
तुझा सहवास मिळतो आई
तुझ्याविना मी कसं
माझं बालपण जगू आई...
सांग ना आई...

**वैशाली शिंदे-देशमुख**

# साहेब होण्यास गेलो

साहेब होण्यास गेलो
साहेब होण्यास गेलो
मी मित्रांसोबत धुळ्यात
पेपर ऑनलाईन म्हणून
पोहचलो लवकर
केंद्रावर अंगणात

भली मोठी रांग उभी
पावसात भावी साहेबांची
धस्स झालं काळजा
तगर्दी पाहून बेकारांची

प्रश्न मनात आला
खूप वाढली बेकारी
कोणाकोणा मिळणार
देव जाणे नोकरी

परीक्षा केंद्रामध्ये
तपासणी साहेबांची
मॅच फोटो तपासणी
प्रवेशपत्र आधारची

येता नंबर माझा
साहेब निरखू लागले
प्रवेशपत्र, आधारात
मला शोधू लागले

एकटक मला पाहत
फोटो मिसमॅच म्हणू लागले
डमी तर नाही ना
शंका घेऊ लागले
मग मी बोलता झालो
फोटो काय घेऊन बसलात सर
इथं तर अख्खं नशीब
मिसमॅच होऊन गेलं सर

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**
**मो. ९४०३३ ८४८८९**